**अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना.**

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक :- मासाका २००८/प्र.क्र.१५०/विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ मे, २००८.

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००३/प्र.क्र.१९/विघयो-२, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४.

२) शासन पूरक पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००३/प्र.क्र.१९/विघयो-२, दिनांक १३ एप्रिल, २००४.

३) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००३/प्र.क्र.१९/विघयो-२, दिनांक ११ ऑगस्ट, २००४.

४) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००३/प्र.क्र.१९/विघयो-२, दिनांक १३ सप्टेंबर, २००४.

५) शासन पूरक पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००३/प्र.क्र.१९/विघयो-२, दिनांक १३ सप्टेंबर, २००४.

६) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००३/प्र.क्र.१९/विघयो-२, दिनांक ३० जानेवारी, २००६.

७) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक मासाका २००४/प्र.क्र.४७४/विघयो-२, दिनांक ३ फेब्रुवारी, २००६.

८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकिर्ण१००८/प्र.क्र.८/०८/१८ (र. व का.), दिनांक १३ मार्च, २००८.

ROTA/H-959(1,000-5-2008)-1

**प्रस्तावना** :- प्रत्येक विषयाच्या बाबतीत पूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन सोप्या व सुटसुटीत भाषेत एकच सर्वसमावेशक आदेश, शासन निर्णय व परिपत्रके निर्गमित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दिनांक १३.३.२००८ च्या परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. त्यास अनुसरुन अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेचा एकच सर्वसमावेशक आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- संदर्भाधीन क्रमांक १ ते ७ येथील सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे की, अनुसूचित जातीच्या यंत्रमाग सोसायट्या, निटिंग गार्मेंटस, कापड प्रोसेसिंग युनिट, शेतीमालावर प्रक्रिया करणा-या सहकारी संस्था, साखर कारखाने, खांडसरी कारखाना रुपांतरीत करणे व तत्सम उद्योगांना शासनामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यास शासन मंजूरी देत आहे. या योजनेचे स्वरुप व त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

**योजनेचे स्वरुप** :- अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना द्यावयाच्या अर्थसहाय्याचे सूत्र खालीलप्रमाणे राहील :-

| | | (प्रकल्प मुल्याच्या) |
|---|---|---|
| (१) | सहकारी संस्थेचा स्वतःचा हिस्सा | ५% |
| (२) | सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल मंजूर करणे | ३५% |
| (३) | विशेष घटक योजनेमधून दीर्घ मुदतीचे कर्ज | ३५% |
| (४) | वित्तीय संस्थांकडून दीर्घ मुदतीचे कर्ज | २५% |
| | एकूण | १००% |

**योजनेच्या अटी व शर्ती** :-

१) या योजनेअंतर्गत केवळ अनुसूचित जातीच्या नोंदणीकृत सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र ठरतील.

२) विशेष घटक योजनेच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक ७०% अनुसूचित जातीचे असावे. सहकारी संस्थांचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरु झाल्यानंतर त्यामधील कर्मचारीवर्ग व कामगारवर्गही ७०% अनुसूचित जातीचा असावा.

३) विशेष घटक योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्जदार संस्था ह्या अनुसूचित जातीच्या असाव्या व त्यांना कर्ज आणि भागभांडवल विशेष घटक योजनेमधून सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल.

४) अर्जदार सहकारी संस्थांनी शासनास सादर केलेल्या प्रकल्प मुल्याच्या किमान ५% भागभांडवल जमा केल्यानंतर त्यांना शासकीय भागभांडवल/दीर्घ मुदतीचे कर्ज मिळण्यास पात्र समजण्यात यावे.

प्रकल्पमूल्य मर्यादा (१) ॲग्रीकल्चर फायनान्स कार्पोरेशन नवी दिल्ली (२) दत्ताजी टेक्नीकल इन्स्टिटयुट इचलकरंजी अथवा (३) मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई (मिटकॉन) अथवा संबंधित वित्तीय संस्था यापैकी कोणत्याही एका संस्थेने निश्चित केल्याप्रमाणे मात्र कमाल ५ ते ७ कोटी (व्यवसायानुरुप) असावी. अर्जदार संस्थांनी यापैकी कोणत्याही एका संस्थेकडून प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावा.

५) अर्जदार संस्थेने एकूण प्रकल्प मुल्याच्या ५% एवढया निधीची उभारणी स्वतः केल्यानंतर ३५% भाग भांडवल व दीर्घ मुदतीचे कर्ज विशेष घटक योजनेअंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल. सहकारी संस्थांनी प्रकल्प खर्चाच्या २५% अर्थसहाय्य कर्ज वित्तीय संस्थांकडून उपलब्ध करुन घ्यावे.

६) सहकारी संस्थांनी प्रकल्प उभारताना संनियंत्रण समिती गठीत करावी व त्यामध्ये शासनाचा म्हणजेच सामाजिक न्याय विभागाचा आणि/अथवा सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा वर्ग १ श्रेणीतील एक प्रतिनिधी राहील.

७) सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर शासन नियुक्त करेल असा सामाजिक न्याय विभागाचा एक अधिकारी संचालक म्हणून राहील.

८) सहकारी संस्थांकडे प्रकल्प उभारणीसाठी प्रकल्प अहवालात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक तेवढी जागा असली पाहिजे. यावर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा. याबाबत सक्षम अधिका-याने प्रमाणपत्र दिले असले पाहिजे, आवश्यक असेल तेथे बिगर शेती परवाना जोडावा. बिगर शेती परवानाची मुदत संपली असल्यास त्यावर मुदतवाढीचे आदेश सक्षम अधिका-याकडून घेण्यात यावे.

९) सहकारी संस्थांनी शासन मान्य यंत्रसामुग्री पुरवठादाराशी यंत्रसामुग्री खरेदीबाबत करार करण्यापूर्वी सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून यंत्रसामुग्री पुरवठादार निश्चित करुन घ्यावा.

१०) प्रकल्प उभारणीकरिता कमाल ५२ आठवडयांचा कालावधी असावा सहकारी संस्थांना निधीच्या उपलब्धतेप्रमाणे निधी मंजूर करण्यात येईल.

११) शासनाकडून जे दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वितरीत केले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत जिल्हाधिकारीकडून घेण्यात यावे व त्यानंतर पुढील हप्ता वितरीत करण्यात यावा.

१२) कर्जाची परतफेड संस्थेच्या देय असलेल्या प्रकल्प मुल्याच्या ७०% रक्कम अदा केल्यानंतर दोन वर्षांनी सुरु करण्यात यावी. कर्ज परतफेडीचा कालावधी ६ वर्षांचा असावा. वित्तीय संस्थांच्या कर्जाची (मुद्दल) वसुली प्रथम ४ वर्षांच्या आंत २४ समान त्रैमासिक हप्त्यांत करण्यात यावी व नंतर व्याजाची वसूली ८ समान त्रैमासिक हप्त्यांत करण्यात यावी. कर्ज वसुलीची जबाबदारी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. कर्ज वसुलीचा विलंबावधी हा वित्तीय संस्थेप्रमाणे असावा.

१३) व्याजाचा दर, दंडनीय व्याज इत्यादि वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्यानुसार राष्ट्रीय कृषी व औद्योगिक विकास बँक, नवी दिल्ली (NABARD) द्वारा निश्चित केल्याप्रमाणे राहील.

१४) लाभार्थी संस्थेने संचालक, समाजकल्याण व संबंधीत सहकारी संस्थांचे अध्यक्ष यांच्या नांवे राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त खाते उघडावे व त्यांनी संयुक्तपणे सदर खाते कार्यान्वित (ऑपरेट) करावे.

१५) ज्या कामाकरिता दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भाग भांडवल मंजूर केले आहे त्याच कामाकरिता सहकारी संस्थेने त्याचा वापर करावा. निधीचा गैरवापर होत असल्याचे दिसून आल्यास दंडात्मक व्याज दरासह महसूली थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१६) प्रकल्पाचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष अनुसूचित जातीचा असावा.

१७) लाभार्थी संस्थेच्या प्रकल्पाच्या संचालक मंडळावर/कार्यकारिणीवर ११ सदस्य असतील त्यापैकी एक सदस्य अमागासवर्गीय व उर्वरित सर्व सदस्य अनुसूचित जातीचे असावे.

१८) लाभार्थी सहकारी संस्थेच्या संयुक्त खात्यात जमा झालेल्या रकमेवरील व्याजाची रक्कम लाभार्थी संस्थेस वापरण्यास परवानगी द्यावी. त्यावर शासनाचा हक्क राहणार नाही.

१९) मंजूर करण्यात आलेले दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भाग भांडवलावरील व्याजाची आकारणी संस्थेला मंजूर करण्यात आलेला निधी त्यांच्या संयुक्त खात्यात जमा झाल्याच्या दिनांकापासून करावी.

२०) लाभार्थी संस्थेची जमीन संस्थेच्या नांवे असल्याचा पुरावा म्हणून संस्थेच्या नावाचा ७/१२ चा उतारा आणि कायदेशीर खरेदीपत्राची सत्यप्रत प्रस्तावासोबत जोडावी. संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी तशी खात्री करुन घ्यावी.

२१) संस्थेला शासनाने मंजूर केलेल्या भाग भांडवल व कर्जाची उचल करण्यापूर्वी संस्थेने प्रकल्पाच्या गहाणखताचा प्रचलित कायद्यानुसार करारनामा करावा. कर्ज अथवा भागभांडवलाची व्याजासह परतफेड होईपर्यंत संपूर्ण प्रकल्प (जमीन, यंत्रसामुग्री आणि प्रकल्पाची इतर मालमत्ता इत्यादी) शासनाकडे गहाण

ठेवावी. गहाणखतावर पहिला हक्क शासनाचा व दुसरा हक्क वित्तीय संस्थेचा राहील. संस्थेच्या संचालक मंडळाला थकीत कर्जासाठी वैयक्तीकरित्या जबाबदार धरण्यात यावे.

२२) शासन (वित्त विभाग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यापैकी संबंधित विभाग) इतर सहकारी संस्थांना कर्ज / भाग भांडवल मंजूर करतेवेळी ज्या अटी व शर्ती घातल्या जातात, त्या सर्व अटी व शर्ती याप्रकरणी लागू करेल.

२३) प्रकल्पाच्या सुनियोजित उभारणीसाठी शासन आवश्यकतेनुसार ज्या अटी व शर्ती वेळोवेळी विहीत करेल त्या अटी व शर्ती या प्रकरणी लागू राहतील.

२४) सहकारी खांडसरी कारखाने आणि सहकारी साखर कारखाने यांच्याबाबतचा अहवाल, आयुक्त, साखर, महाराष्ट्र राज्य, पुणे व शेतीमाल सहकारी प्रक्रीया संस्था यांच्याबाबतचा अहवाल सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून छाननी करुन घेण्यात यावा. सूतगिरणी आणि निटींगच्या प्रकल्पाला संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक राहील. तसेच औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रकल्प अहवालांना मिटकॉन, सिकॉम अथवा राष्ट्रीयकृत बँक यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक आहे.

२५) वरील अटी व शर्तीनुसार प्रस्ताव तपासून योग्य आहे किंवा नाही याबाबत अभिप्राय देण्याची संपूर्ण जबाबदारी संचालक, समाजकल्याण यांची राहील.

२६) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत विहीत पध्दतीने अर्ज करणा-या संस्थांचाच, कर्ज/भाग भांडवल मंजूरीसाठी, विचार करण्यात येईल.

२७) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या सहकारी संस्थांच्या मुख्य प्रवर्तकाने पूर्वी एखाद्या प्रकल्पासाठी शासनाकडून अर्थसहाय्य घेऊन असा प्रकल्प पूर्णत्वास न नेता तो विविध कारणास्तव मोडीत काढला असल्यास अशा मुख्य प्रवर्तकाने दुसरा प्रकल्प उभारण्याकरिता प्रस्ताव सादर केल्यास त्यास मान्यता देण्यात येऊ नये.

२८) तांत्रिक बाबींवरील अहवाल हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालयाने संचालक, समाजकल्याण,पुणे यांना सादर केल्यानंतर त्यांनी सहकारी कायद्यातील तरतूदीप्रमाणे संबंधित सह निबंधक/ जिल्हा उपनिबंधक किंवा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडून सदर संस्थांची वैधानिक बाबींवरील स्थळ तपासणी करुन घ्यावी.

२९) योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवलाची रक्कम प्रकल्प पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून १० समान हप्त्यांत १० वर्षात संस्थेने शासनास परत करणे आवश्यक आहे.

३०) शासनाने दिलेल्या भागभांडवलाचे शेअर्स महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नांवे करुन त्याचे प्रमाणपत्र संबंधित प्रादेशिक उपसंचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांचेकडे देऊन त्याच्या सत्यप्रती संस्थेने सादर केल्या पाहिजेत.

३१) शासकीय भागभांडवलाची थकबाकी व्याजासह संपूर्ण परतफेड करता येणे सुलभ व्हावे म्हणून या रक्कमेची परतफेड होईपर्यंत संस्थेने संस्थेच्या सभासदांना ४% पेक्षा अधिक लाभांश देऊ नये.

३२) संस्थेने रक्कम प्रकल्पावर खर्च केल्यानंतर सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२. हा शासन निर्णय महसूल, नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५२/०४/व्यय-१४, दिनांक २७.२.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८०५२२१२४४५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ज.न. राठोड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (वस्त्रोद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, साखर, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.